उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख २३ जानेवारी, १९५७ | अंक ४


## विविध माहिती

**होमिओपॅथिक कॉलेजची मागणी**— मध्यप्रदेशांतील होमिओपॅथिक डॉक्टर्सची परिषद इंदूर येथें भरली होती. परिषदेला राज्याच्या सर्व भागांतून सुमारें ५० प्रतिनिधी आले होते. मध्यप्रदेश सरकारनें होमिओपॅथिक शिक्षण देणारें व त्याची पदवी देणारें कॉलेज काढावें आणि त्याला जोडून एक इस्पितळहि काढण्यांत यावें अशी मागणी परिषदेनें केली.

**नव्या कालव्याची सूचना**—यमुना नदींतून आग्रा येथें काढण्यांत आलेल्या कालव्यापासून छोटासा दुय्यम कालवा काढण्यांत यावा अशी सूचना उत्तर-प्रदेश व राजस्थान सरकारांनीं केली आहे. असा कालवा काढण्यांत आल्यास भरतपूर जिल्ह्यांतील १८,००० एकर जमिनीला पाण्याचा हुकमी पुरवठा होऊं लागेल.

**पैशाचा अक्षरशः धूर**—सुरत येथील कलेक्टर श्री. हरिलाल भट हे अल्प-बचत-योजनेच्या प्रचारसभेत बोलत होते. त्यांनीं आपल्या भाषणांत अशी माहिती सांगितली कीं सुरत शहर व आसपासचा भाग ह्यामधील लोक दरसाल सुमारें २,५०,००० रुपये धूम्रपानासाठी खर्च करीत असतात. धूम्रपान न करतां ही रक्कम वाचवितां येईल असें त्यांनीं सुचविलें.

**भारताची रशिआकडून खरेदी**—भारतानें रशिआंत खरेदी केलेली यंत्रसामुग्री घेऊन 'कुशाबिशेव्ह' ही रशिअन बोट अतिपूर्वेकडील एका बंदरांतून निघाली आहे. भारत व रशिआ ह्यांच्यांत यंत्रसामुग्री संबंधींचा करार झाल्यावर माल घेऊन येणारी ही पहिलीच रशिअन बोट आहे.

**वर्गीकृत जमातींना साह्य**—केरळमधील वर्गीकृत जमातींच्या हितासाठी राज्य सरकारनें एक पंचवार्षिक कार्यक्रम आंखला आहे. भारतीय सरकारनें कार्यक्रमास मदत म्हणून १५ लाख रुपये मंजूर केले आहेत. घरबांधणी, हस्तकौशल्याचीं शिक्षणकेंद्रें, आरोग्ययोजना, इत्यादि बाबींचा कार्यक्रमांत समावेश आहे.

**मानसिक आरोग्याची संस्था**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ऑल इंडिआ इन्स्टिटयूट ऑफ मेंटल हेल्थ ह्या बंगलोर येथील संस्थेच्या विकासासाठी ४१ लाख रुपयांच्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. संस्थेसाठी इमारत व उपकरणें ह्यांची व्यवस्था करण्यासाठी ती खर्चली जाईल.

**मध्यप्रदेशाची राजधानी**—मध्यप्रदेशाची राजधानी भोपाळ येथें होणाऱ्या नव्या बांधकामाची आखणी करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली आहे. राजधानींत घरांची टंचाई आहे. घरें व इमारती बांधण्यासाठी भारतीय सरकारनें राज्यसरकारला १ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे.

**शाळकरी मुलांमधील दंतरोग**—सौराष्ट्रामधील दंतवैद्यांच्या संघटनेनें राजकोट येथील शाळेंत जाणाऱ्या मुलांच्या दांतांच्या आरोग्याची पहाणी करण्याचें ठरविलें आहे. दांतांच्या आरोग्याविषयीं लोकांत जाणीव उत्पन्न करण्याचें कार्य संघटना करीत असते. संघटना राजकोट मधील २०,००० विद्यार्थ्यांच्या दांतांची आरोग्यदृष्ट्या तपासणी करील.

**ब्रिटन सोडण्यास उत्सुक**—ब्रिटनमधील लोकांत देशांतर करण्याची वाढती प्रवृत्ति दिसून येऊं लागली आहे. लंडनमधील कॅनडाच्या सरकारच्या परदेशगमन कचेरींत दर आठवड्याला २०,००० ब्रिटिश नागरिकांचे अर्ज येत आहेत. ब्रिटनमध्यें वेतन कमी व कर जास्त, अशी परिस्थिति असल्यामुळें बचत करतां येत नाहीं अशी बहुतेकांची तक्रार आहे.

**बिहारमधील कोळशाचा साठा**—बिहारमधील राणीगंज कोळशाच्या खाणीच्या टापूंत ६०० कोटी टन कोळशाचा साठा असावा, असा अंदाज १९२८ सालीं करण्यांत आला होता. भारतीय सरकारच्या भूगर्भ खात्यानें १९५१-५२ सालीं ह्या टापूची पुन्हां तपासणी केली होती. कोळशाचा साठा सुमारें १,३०० कोटी टन असावा असें आतां आढळून आलें आहे.

**सुएझचा कालवा व पाकिस्तान**—सुएझचा कालवा वाहतुकीस बंद झाल्यानें पाकिस्तानच्या आर्थिक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. आणखी सहा आठवड्यांत कालवा खुला झाला नाहीं तर पाकिस्तानांत गरजेच्या सर्व वस्तूंच्या पुरवठ्यावर व किंमतीवर कडक नियंत्रणें बसवावीं लागतील अशीं चिन्हें आतांच दिसूं लागलीं आहेत.

**इंटरनॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशन**—जागतिक बँकेची एक उपसंघटना म्हणून इंटरनॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशन ही संस्था काम करते. आतां संस्थेच्या सभासदांची संख्या ४७ झाली आहे. संस्थेच्या अध्यक्षांनीं असें जाहीर केलें आहे कीं भांडवलाच्या रुपानें संस्थेजवळ आतां ९ कोटी डॉलर्सपेक्षा थोडा अधिक संचय झाला आहे.

**केरळ राज्याचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—केरळ राज्यसरकारनें आखलेल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पूर्तीसाठी ८५ कोटी रुपये लागतील, असें अधिकृतरीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. राज्यांची पुनर्घटना होण्यापूर्वीच्या त्रावणकोर-कोचीनच्या राज्यसरकारनें ७२ कोटी रुपयांचा कार्यक्रम आखला होता. अद्याप अखेरचा निर्णय व्हावयाचा आहे.

## पश्चिम आशियांतील तेलाच्या कंपन्यांची मालकी

### अमेरिका अग्रेसर

पश्चिम आशियांतील तेलाचें उत्पादन जागतिक उत्पादनाच्या एकतृतीयांशाइतकें आहे व तेथील भूगर्भातील सांठा जागतिक सांठ्याच्या दोनतृतीयांशातका आहे. ह्या भूगर्भातील सांठ्यापैकी ५८·४०% वर अमेरिकन, ३१·२% वर ब्रिटिश, ५·३% फ्रेंच व ४·२% डच ह्या प्रमाणांत अधिकार चालतो.

| देश | कन्सेशनधारी कंपनीची मालकी | १९५५ च्या उत्पादनांतील वांटा. (दशलक्ष मेट्रिक टन) | | |
|---|---|---|---|---|
| | | अमेरिका | ग्रे. ब्रि. | इतर |
| कुवेत | ५०% अमेरिका<br>५०% ग्रे. ब्रि. | २७·४ | २७·४ | — |
| सौदी अरेबिया | १००% अमेरिका | ४७·१ | — | — |
| इराक | २३·७५% अमेरिका<br>२३·२५% ग्रे. ब्रि.<br>४३% इतर | ७·९ | ११·० | १४·३ |
| इराण | ४०% अमेरिका<br>४०% ग्रे. ब्रि.<br>२०% इतर | ६·४ | ६·४ | ३·२ |
| कतार | इराकप्रमाणें | १·३ | १·८ | २·३ |
| बेहरिन | १००% अमेरिका | १·५ | — | — |
| इतर | १००% अमेरिका | १·३ | — | — |
| | एकूण | ९२·९ | ४६·६ | १९·८ |
| | % | ५८·४ | २९·३ | १२·३ |

## शेड्यूल्ड बँकांची तुलनात्मक परिस्थिति

( आंकडे हजारांचे आहेत )

| | ४–१–१९५७ | ६–१–१९५६ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| १. डिमांड देणीं | | |
| इतर बँकांकडून घेतलेलीं कर्जें | ६,९३,२० | ५,०६,३४ |
| इतर डिमांड देणीं | ६३९,८६,७३ | ६०९,५६,५१ |
| २. टाइम देणीं | | |
| इतर बँकांकडून घेतलेलीं कर्जें | २,३४,०० | ४,१६,५० |
| इतर टाइम देणीं | ४५५,४४,९३ | ४०९,१६,८४ |
| ३. स्टेट बँकेकडून घेतलेलीं कर्जें ( सर्व डिमांड देणीं ) | १०,२१,१५ | ९,८४,४८ |
| ४. रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलीं कर्जें | ७३,१९,४९ | २९,८४,१५ |
| ५. रोकड रक्कम | ३७,५१,९५ | ३८,२६,८६ |
| ६. रिझर्व्ह बँकेंत ठेव | ४८,२५,५७ | ५०,४७.८२ |
| ७. इतर बँकांत चालू खात्यावर ठेव | ११,५३,७६ | ११,५२,५५ |
| ८. कॉल व शॉर्ट नोटीस मनी | ९,०६,१५ | ८,३५,०१ |
| ९. इन्व्हेस्टमेंटस | ३६४,४५,८७ | ३८२,९३,१२ |
| १०. दिलेलीं कर्जें | ६३५,९०,२४ | ५२६,९८,८७ |
| ११. विकत घेतलेलीं व डिस्कौंट केलेलीं अंतर्गत बिलें | ११३,३४,६८ | ७६,८६,३७ |
| १२. विकत घेतलेलीं व डिस्कौंट केलेलीं विदेशी बिलें | ५२,४५,४८ | ४८,१४,४० |


# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिकोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी, २४ बार्शी.

वसूल भांडवल रु. ६,००,०००
रिझर्व्ह व इतर फंडूस रु. २,४६,०००
ठेवी रु. १,०५,००,०००
एकूण खेळतें भांडवल रु. १,२०,०,००००

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

पच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : –श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

किर्लोस्कर लहान, मोठे
**लोखंडी नांगर**



भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमिनींच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या बनावटीचे योग्य असे लहान व मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमिनीच्या भगदुराप्रमाणे नांगरांची निवड करा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. २३ जानेवारी, १९५७



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अविकसित देशांचा आर्थिक उद्धार

आशिआ आणि आफ्रिका ह्या खंडांतील अविकसित देशांची औद्योगिक प्रगति घडवून आणण्यासाठी पश्चिम जर्मनींत हालचाली होऊं लागल्या आहेत. जर्मनींतील कांहीं उद्योगपती ह्या बाबतींत लक्ष घालूं लागले आहेत. ह्यासंबंधीं सुचविल्या जाणाऱ्या अनेक योजनांत पश्चिम जर्मनीचे व्हाइस चॅन्सेलर मि. फ्रॅन्झ ब्लूशर ह्यांनीं सुचविलेली एक योजनाहि आहे. मि. ब्लूशर हे गेल्या वर्षी भारतांत येऊन गेले आहेत. त्यांनीं सुचविलेल्या योजनेनें जर्मनींतील लोकांचें विशेष लक्ष वेधलें आहे.

मि. ब्लूशर ह्यांनीं सुचविलेल्या योजनेचा उगम ज्याला 'शहाणा स्वार्थ' असें संबोधण्यांत येतें, त्यामधून झालेला आहे. ते म्हणतात कीं, जगाची सध्यांची परिस्थिति मन अस्वस्थ करणारी आहे. जगांतील एक तृतीयांश लोक उपासमारीला तोंड देत कसेंबसें जगत आहेत. ह्या परिस्थितीमधून अखेर मोठी आपत्ति उद्‌भवल्याशिवाय रहाणार नाहीं. म्हणून जगांतील अविकसित राष्ट्रांची औद्योगिक प्रगति घडवून आणण्यासाठी एक मोठा आंतरराष्ट्रीय निधी जमविण्यांत यावा. निधी उभारण्यासाठी अधिकांत अधिक राष्ट्रांनीं आपली वर्गणी द्यावी. अविकसित राष्ट्रांतील औद्योगिक विकास साधण्यासाठी दीर्घ मुदत लागणाऱ्या ज्या योजना हातीं घ्याव्या लागतील त्या योजनांसाठी ह्या फंडांतून अल्प व्याजाच्या दरानें कर्जें देण्यांत यावींत. जर्मनीनें ह्या फंडाला मदत म्हणून ३० कोटी मार्कस द्यावे. मि. ब्लूशर ह्यांनीं सुचविलेल्या योजनेच्या मुळाशीं जर्मनींतील सध्यांची आर्थिक परिस्थितीहि आहे. युद्धोत्तर काळांत जर्मनींत भरभराटीची जी लाट उसळलेली आहे तिची शीग अजूनहि ओसरलेली नाहीं. पण कांहीं दुश्चिन्हें दिसूं लागलीं आहेत. जर्मन कारखान्यांकडे येणाऱ्या मागण्या कमी होऊं लागल्या आहेत. उद्योगधंद्यांत गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलांत घट होऊं लागली आहे. त्यामुळें चाणाक्ष धंदेवाले पुढेंमागें भरभराटूं शकणाऱ्या बाजारपेठांकडे लक्ष देऊं लागले आहेत. आशिआंतील अविकसित देशांकडे ते भावी बाजारपेठा म्हणून बघूं लागले आहेत. ह्या देशांतील लोकसंख्या वाढत आहे आणि त्याचबरोबर हळूहळू लोकांचें जीवनमानहि उंचावत चाललें आहे. ह्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी जर्मन कारखानदार तयार होऊं लागले आहेत.

मि. ब्लूशर ह्यांनीं आपल्या योजनेंत अविकसित राष्ट्रांनाहि धोक्याचा इषारा दिला आहे. ह्या देशांनीं शेतीच्या विकासाकडे दुर्लक्ष करून औद्योगिक प्रगति साधण्याचा प्रयत्न करूं नये अशी सूचना करून ते पुढें म्हणतात, कीं समतोल आर्थिक विकास होण्यासाठी दोन्ही विभागांची प्रगति एकसाथ झाली पाहिजे. अवजड उद्योगधंदे उभारण्याच्या नादांत अन्नाच्या उत्पादनाकडें दुर्लक्ष झाल्यामुळें चलनवृद्धीचें चिंताजनक दडपण कित्येक देशांत उत्पन्न झालेलें आहे. अशा प्रकारच्या धोरणामुळें परकीय चलनाचा तुटवडाहि मोठ्या प्रमाणांत उत्पन्न होतो. हा धोका टाळण्यांत आला पाहिजे. तथापि, विकासाच्या योजना अंमलांत आणण्याच्या कामीं दिरंगाई होतां कामा नये. पूर्व आशिआंतील लोकसंख्या झपाझप वाढत आहे, आणि आग्नेय आशिआंतील धान्याचें उत्पादन मात्र अद्यापहि युद्धपूर्व काळाच्या पातळीवर आलेलें नाहीं. अशा परिस्थितींत ह्या भागांत कम्युनिझमच्या प्रसाराला वाव असणें साहजिक आहे. म्हणून दुसऱ्या कांहीं कारणांसाठी नाहीं तरी कम्युनिझमच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी तरी प्रगत देशांनीं मागासलेल्या देशांना मदत देणें जरूर आहे.

---

## कोलंबो योजनेप्रमाणें मिळालेली मदत

कोलंबो योजनेच्या सल्लागार समितीनें आपला वार्षिक अहवाल प्रसिद्ध करून दक्षिण आशिआ व आग्नेय आशिया ह्या भागांतील देशांना १९५० ते १९५६ ह्या कालखंडांत किती आर्थिक साह्य देण्यांत आलें, त्यासंबंधींची माहिती प्रसिद्ध केली आहे. आर्थिकदृष्ट्या सहकार्य करून आशिआंतील ह्या भागांचा विकास घडवून आणण्यासाठी ही योजना आखण्यांत आली होती. तीस ऑस्ट्रेलिआ, ब्रह्मदेश, कांबोडिआ, कॅनडा, सीलोन, भारत, इंडोनेशिआ, लाओस, नेपाळ, न्यूझीलंड, पाकिस्तान, व्हिएटनाम आणि ब्रिटन इतक्या राष्ट्रांनीं हातभार लावला होता. वरील कालखंडांत मदत देणाऱ्या राष्ट्रांकडून आशिआंतील देशांना ८५ कोटी पौंड रक्कम मिळाली. रुपयाच्या चलनांत ही रक्कम १,१३० कोटी रु. इतकी भरते. त्याशिवाय आणखी १२·८ कोटी पौंड म्हणजे सुमारें १७० कोटी रुपये जागतिक बँकेनें दिलेले आहेत. कोलंबो योजनेंत समाविष्ट करण्यांत आलेल्या देशांना ब्रिटननें ८·६ कोटी पौंड रकमेची मदत केलेली आहे. ह्या मदतींत देणगी, कर्ज, उधारीनें दिलेला माल व तांत्रिक साह्य ह्या सर्व बाबींचा समावेश झालेला आहे. ब्रिटननें जागतिक बँकेला आपली वर्गणी म्हणून जी रक्कम दिली आहे, तीमधून १·८ कोटी पौंड म्हणजे सुमारें २३·४ कोटी रुपये आणखी देण्याची तयारीहि दाखविण्यांत आली आहे. आर्थिक विकासाच्या कार्यांत चांगली प्रगति झाल्याचें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. विजेच्या उत्पादनांत योजनापूर्व कालापेक्षा १२ टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणें पाटबंधाऱ्यांखालील जमीनहि बरीच वाढलेली आहे.

---

## सहकारी अधिकाऱ्यांचें शिक्षण

मुंबई येथें सहकारी चळवळीविषयीं शिक्षण देणाऱ्या संस्थेच्या मध्यवर्ती समितीची चौथी परिषद भरली होती. परिषदेचें उद्‌घाटन रिझर्व्ह बँकेचे पूर्वीचे गव्हर्नर श्री. बी. रामराव ह्यांनीं केलें. ह्या प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले कीं समाजवादी पद्धतीची समाजरचना उभारून राजकीय लोकशाहि अर्थपूर्ण करण्याचें ध्येय देशानें स्वीकारलेलें आहे. नवी समाजरचना साहजिकच सहकारी स्वरूपाची असली पाहिजे. सहकारी चळवळ यशस्वी होण्यासाठीहि सहकारी व्यवहारांच्या पद्धतीचें शिक्षण

देणें जरूरीचें आहे. सहकारी चळवळीला मदत करण्याच्या हेतूनें गेल्या कांहीं वर्षांत रिझर्व्ह बँकेनें कांहीं पावलें टाकलीं आहेत. भारतामधील ७० टक्के जनता शेतीवर जगत असून कशीबशी गुजराण करत आहे. अशा परिस्थितींत देशांतील मध्यवर्ती बँकेनें उत्पादक कर्जाच्या जरूरीकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. सरकारनें सहकारी पद्धतीऐवजीं दुसरा मार्ग स्वीकारला तर देशांत हुकुमशाही निर्माण झाल्याखेरीज राहणार नाहीं. मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष श्री. वैकुंठराय मेहता म्हणाले कीं, १९५२ च्या डिसेंबरमध्यें समितीची स्थापना करण्यांत आली. तेव्हांपासून आतांपर्यंत ६,००० लोकांना सहकारी अधिकाऱ्यांचें शिक्षण देण्यांत आलें. पहिल्या प्रथम रिझर्व्ह बँकेनें सहकाराच्या शिक्षणासाठी ५ लाख रुपये मंजूर केले होते. पण नंतर दोनच वर्षांत ही रक्कम १४ लाखांपर्यंत वाढविण्यांत आली. त्याशिवाय मध्यवर्ती सरकारकडूनहि २१ लाख रुपयांची मदत मिळाली. शिकून तयार झालेले अधिकारी सहकारी खात्यांत व निरनिराळ्या राज्यांत कामें करीत आहेत.

---

**शाळांमधील शास्त्रांचें अध्यापन**—माध्यमिक शाळांतील शास्त्रीय विषयांच्या अध्यापनांत सुधारणा घडवून आणण्यासाठी भारतीय सरकारच्या शिक्षणखात्यानें एक योजना आखली आहे. शास्त्रांचें अध्यापन करणाऱ्या ४० शिक्षकांना ब्रिटन, कॅनडा व अमेरिका ह्या देशांत पाठवून जरूर तें शिक्षण देण्यांत येणार आहे.

**अणुशक्तीवर चालणारी बोट**—ध्रुवप्रदेशांतील समुद्रांतील बर्फ फोडून प्रवास करणारी अणुशक्तीवर चालणारी बोट रशिआ तयार करीत आहे, अशी वार्ता गेल्या सालीं आली होती. चालू वर्षी अशा प्रकारची बोट तयार होऊन ती लेनिनग्रॅड येथील बंदरांतून प्रत्यक्ष समुद्रप्रवासास निघेल असें समजतें.

**खनिज तेलाचा शोध**—पश्चिम बंगालमध्यें खनिज तेलाच्या शोधासाठी विहिरी खोदण्याचें काम पुढील तीन महिन्यांत सुरू करण्यांत येणार आहे. ह्यासंबंधीची प्राथमिक तयारी पूर्ण झाली असून आतां अमेरिकेकडून जरूर ती यंत्रसामुग्री येण्याचाच काय तो अवकाश आहे. प्रत्यक्ष खोदाईला प्रथम बरद्वानजवळ प्रारंभ होईल.

**पश्चिम जर्मनीची मदत**—पश्चिम जर्मनीच्या सरकारनें सुएझचा कालवा साफ करण्यासाठी १० लाख डॉलर्स देण्याचें ठरविलें आहे. कालवा साफ झाल्यावर त्यामधून जाणाऱ्या जर्मन बोटींना कालव्याच्या वापरासाठी जे पैसे द्यावे लागतील ते वरील रकमेंतून वळते करून घेण्याचा हक्क मात्र राखून ठेवण्यांत आला आहे.

**इजिप्तला रशिआचा गहूं**—रशिआनें इजिप्तला ४०,००,००० टन गहूं पुरविण्याचा करार केला होता. कराराप्रमाणें दोन रशिअन बोटी गहूं घेऊन अलेक्झांड्रिआ बंदराला लागल्या आहेत. रशिआनें आतांपर्यंत ९८,००० टन गहूं इजिप्तला पाठविला आहे.

**कनिष्ठ नौकरांचे पगार**—राज्य सरकारांच्या कनिष्ठ नौकरवर्गाच्या पगारांच्या श्रेणी वाढविण्याचें मध्यवर्ती सरकारनें तत्त्वतः मान्य केलें आहे. प्रत्येक राज्यामधील श्रेणी सारखी राहील असा ह्याचा अर्थ नाहीं. राज्य-सरकारांकडून ह्याविषयीं सूचना मागविण्यांत आल्या आहेत. मध्यवर्ती सरकार ह्या कामासाठी १५ ते २० कोटी रुपये मंजूर करील असा अंदाज आहे.

## मुद्रकांच्या कार्याची सामाजिक उपयुक्तता

### श्री. मुकुंदराव किर्लोस्कर ह्यांचें महाराष्ट्र मुद्रणपरिषदेंत स्वागताध्यक्षीय भाषण

"तुम्ही मुद्रक म्हणजे पांढऱ्यावर काळें करणारे!" असें म्हणून अनेक वेळां आपला उपहासानें उल्लेख केला जातो.

परंतु दैनंदिन जीवनांत हरघडी अशा शेंकडों गोष्टी लागतात कीं ज्यासाठी पांढऱ्यावर काळें करणाऱ्या आमच्या कलेची समाजाला गरज लागते—मग ती दैनिक वृत्तपत्रांच्या स्वरूपांत असो, लग्नपत्रिकेच्या स्वरूपांत असो, ज्ञानेश्वरीच्या स्वरूपांत असो, किंवा अंकलिपीच्या स्वरूपांत असो.

पण या कामगिरींत समाजसेवेचा भाग कितीसा आहे? अशी शंका कोणी व्यक्त केली तर तें स्वाभाविक आहे. त्यांच्या माहितीसाठी मग हें स्पष्ट करणें भाग आहे, कीं ही कामगिरी करीत असतांना नकळत समाजाची सौंदर्यदृष्टि घडविण्यासहि आम्ही मुद्रक मोठीच मदत करीत असतों.

रस्त्यावरची एखादी सुंदर इमारत, कोपऱ्यावरच्या बागेची मनोहर आखणी, चौकामधला आकर्षक पुतळा, नयनमनोहर दृश्यांचें दर्शन घडविणारा एखादा चित्रपट, किंवा चित्ताकर्षक वेशभूषा केलेली एखादी सुंदर स्त्री, या व यांसारख्या गोष्टी ज्याप्रमाणें सामान्य नागरिकांची सौंदर्यदृष्टि घडवीत असतात, त्याप्रमाणेंच त्याच्या रोजच्या वाचनांत येणारें एखादें सुव्यवस्थित छपाईचें दैनिक, दुकानाच्या भिंतीवरील एखादें साबणाचें आकर्षक पोस्टर, श्रेष्ठ कलावंताच्या कलाकृतींच्या मुद्रित प्रतिकृति किंवा रेखीव छपाईचा आणि बांधणीचा एखादा ग्रंथ, या गोष्टीहि सामान्य वाचकाला सौंदर्याच्या नव्यानव्या अंगोपांगांचा परिचय करून देत असतात.

पण मुद्रणकला केवळ समाजांतील सौंदर्यदृष्टि घडविण्यास मदत करूनच थांबत नाहीं, तर समाजाचें मन घडविण्याचें तें एक अत्यंत प्रभावी साधन आहे.

या साधनाच्या सामर्थ्याची प्रचीति वृत्तपत्रसृष्टीकडे नजर फेकली कीं सहज येण्यासारखी आहे. जनमत घडविणारें अत्यंत मोठें अस्त्र म्हणून आजच्या युगांत वृत्तपत्रांचा उल्लेख केला जातो. अत्यंत थोड्या अवधींत वृत्तपत्राच्या लक्षावधि प्रति तयार करून राष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत व समाजाच्या सर्व थरांत त्या पसरविण्याची जी अद्भुत किमया मुद्रणकलेंतील आधुनिक शोधामुळें व तंत्रामुळें शक्य झाली आहे तीच आजच्या वृत्तपत्रसृष्टीमागील फार मोठी शक्ति होय, हें नव्यानें सांगावयास हवें काय?

तीच गोष्ट लोकशिक्षणाबाबतची. उद्या आपल्या करोडो निरक्षर बांधवांना साक्षर व सुसंस्कृत करण्याच्या महान् कामगिरीला आपलें सरकार नेटानें हात घालील, तेव्हां अल्लाउद्दिनाच्या दिव्याप्रमाणें मुद्रणकलाच हरघडी सरकारच्या सेवेला उभी राहूं शकेल हें भाकितहि नव्यानें करावयास हवें असें नाहीं.

आमचें सामर्थ्य नक्की कशांत आहे तें आम्हांला समजलें, तर त्याचा वापर करतांना कोणत्या सामाजिक जबाबदाऱ्या व पथ्यें आम्हीं पाळलीं पाहिजेत तेंहि आम्हांस स्पष्ट होईल. त्याचबरोबर मुद्रणकलेकडे किंवा व्यवसायाकडे दुर्लक्ष करणें, किंवा त्यांच्या प्रगतीच्या मार्गांत अडथळे आणणें म्हणजे लोकशिक्षणाचें व जागृतीचें एक प्रभावी साधन दुबळें करणें होय, हें समीकरणहि सरकारच्या मनावर पक्कें ठसेल.

## कै. श्री. केशवराव केळकर, एम्. ए., एलएल्. बी. वकील यांना श्रद्धांजलि



( लेखकः—श्री. नी. ना. क्षीरसागर, मॅनेजिंग डायरेक्टर, दि भारत इं. बँक लि. पुणें. )

### भा. इं. बँकेचे पहिले अध्यक्ष

महाराष्ट्रियांनीं बँकिंगचे क्षेत्रांत पदार्पण करण्यास नुकतीच सुरवात झाली होती व पुण्यांत १९३५ व १९३६ या सालांत दोन जॉइंट स्टॉक बँका स्थापन झाल्या होत्या. सन १९३७ चे अखेरीस भारत इंडस्ट्रिअल बँकेची प्राथमिक तयारी होऊन बँकेच्या संचालक मंडळांतील सदस्यांची नियुक्तीहि झाली होती. बँकेच्या संचालक मंडळांत पुणें शहरांतील नामांकित मंडळी विविध क्षेत्रांत काम करणारी अशी लाभली होती; तथापि बँकेस अध्यक्ष कोणास नेमावें हा प्रश्न महत्त्वाचा असा होता. औद्योगिक क्षेत्रासारख्या नवीन क्षेत्रास भांडवल पुरविण्याचा उद्देश पुढें ठेवून बँकेचें कार्यक्षेत्र आंखलें होतें व या नवीन उपक्रमाची जबाबदारी अंगावर घेऊन व लोकांचा विश्वास संपादन करून बँकेस कार्य करावयाचें असल्यानें अध्यक्षासारख्या जबाबदारीच्या पदावर श्री. केशवराव केळकर, पुण्यांतील नामांकित वकील व विविध कार्यांत काम करणारे, त्यांचेपुढें बँकेची प्राथमिक जुळवाजुळव, उद्देश, वगैरे सर्व बाबी मांडल्या व त्या त्यांना पटल्या. त्याच सुमारास श्री. केळकर यांना पुण्यांतील एका नामवंत बँकेंत संचालक मंडळावर घेण्यासंबंधींचा प्रयत्न चालू होता. एक संस्था स्थापन होऊन महाराष्ट्रांत बोलबाला झालेली बँक व दुसरी नवीन निघणारी बँक व त्यांत अध्यक्षासारखी जबाबदारी पत्करावयाची असा दुहेरी प्रसंग श्री. केशवरावजींच्या पुढें होता. तथापि नवीन उपक्रमासंबंधींचा विश्वास व त्यांतील कार्यकर्त्यांसंबंधींची आपुलकी या दोन्हीं गोष्टींमुळें त्यांनीं आमचे बँकेंत अध्यक्षस्थान स्वीकारलें व १४ एप्रिल, १९३८ ला आमची बँक त्यांचे अध्यक्षतेखाली नोंदली गेली. तेथपासून ते सन १९४९ पर्यंत सतत ११ वर्षें ते बँकेचे अध्यक्ष होते.

### भागानगर-सत्याग्रह निरोपसमारंभ

बँकेच्या संचालक मंडळांत व्यापारी क्षेत्रांतील वेगवेगळ्या राजकीय मतप्रणालीची मंडळी होती; तथापि श्री. केशवरावांनीं भागानगर सत्याग्रहींचा एक जथा घेऊन जावें असें हिंदुमहासभेतर्फें ठरलें. त्यावेळीं बँकेतर्फें एक खाजगी निरोपसमारंभ साजरा करण्यांत येऊन संचालक मंडळींनीं वैयक्तिक स्वरूपांत एक लहानशा रकमेची थैलीहि समर्पण केली. भागानगर येथें जाणाऱ्या सत्याग्रहींना तसेंच पुढाऱ्यांना तुरुंगांत अत्यंत वाईट तऱ्हेनें वागवून, वेळप्रसंगीं मारहाणहि करीत असत अशी माहिती असतांना देखील श्री. केशवरावजी तत्त्वनिष्ठेसाठी सत्याग्रहांत समाविष्ट झाले हें सर्वश्रुतच आहे. सदर समारंभाचें अध्यक्षस्थान आमचे संचालक मंडळांतील एक सदस्य श्री. बी. बी. वाळवेकर ( काँग्रेस ) यांनीं स्वीकारलें होतें. या प्रसंगाचा फायदा घेऊन पुण्यांतील एका वर्तमानपत्रानें " भागानगर सत्याग्रहास काँग्रेसचा पाठिंबा " असा मथळा देऊन ही बातमी प्रसृत करण्याचीहि संधि साधली !

भागानगर सत्याग्रहींना झालेल्या मारहाणींत श्री. केशवरावजींनाहि बराच मार बसला व त्या मारामुळें त्यांचे प्रकृतीवर कायमचा परिणाम झाला व तेथपासून त्यांची प्रकृति ढासाळण्यास सुरवात झाली असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

### बँकेची लक्ष्मीरोडवरील जागा

आपल्या बँकेस प्रमुख ठिकाणीं जागा मिळावी व त्यावर बँकेची स्वतःची इमारत बांधावी अशी कल्पना संचालक मंडळांत चर्चेस असतांना बँकेनें हल्लींच्या घेतलेल्या जागेच्या व्यवहाराबाबत अनेक साधकबाधक गोष्टी इतक्या जलद होत होत्या कीं, त्यांचा निर्णय त्या त्या ठिकाणीं घेणें महत्त्वाचें होतें. लक्ष्मी रोडसारख्या महत्त्वाचे ठिकाणची जागा, अनेक संस्था व व्यक्ती यांचे चाललेले प्रयत्न, या सर्व परिस्थितींतून मार्ग काढून बँकेस जागा मिळविण्याचे दृष्टीनें श्री. केशवरावजींची अध्यक्ष या नात्यानें कामगिरी महत्त्वाची होती. या व्यवहारांत बँकेवर थोडेसें नाराज झालेल्यांची समजूत काढण्याचें अवघड कार्य श्री. केशवरावजींनीं अंगावर घेतलें होतें व त्याप्रमाणें त्यांनीं तें कार्य केलें व त्यांचे व बँकेचे संबंध बिघडूं दिले नाहींत. बँकेची इमारत झाल्यानंतर 'वास्तुशांति' समारंभास ते प्रकृतीचे दुर्बलतेमुळें हजर राहूं शकले नाहींत; तरीपण न चालतां येण्याजोगी परिस्थिति असूनाहि मोटारींतून येऊन ते इमारत पाहून गेले व समाधान व्यक्त केलें.

### विशेष प्रसंग

१९४७ सालीं बँकेच्या लोणावळा शाखेंत चोरी होऊन बरीच मोठी रक्कम चोरीस गेल्याचें वृत्त सर्वश्रुतच आहे. बँकेस लागलेल्या नुकसानीचा हा एक मोठा धक्का होय ! या चोरीचे प्रकरणांत पोलिसतपास सुरू असतांना जी माहिती बाहेर आली त्यांत या चोरीचे प्रकरणीं एका राजकीय पक्षाशीं संबंध असलेल्या कार्यकर्त्यांचा संबंध पोहोंचत असावा असे धागेदोरे पोलिसांना मिळाले होते असें म्हणतात. या चोरीचे प्रकरणीं श्री. केशवरावजी यांनीं जातीनें बरीच मेहेनत घेऊन बँकेची रक्कम सांपडण्याबाबत खटपट केली. सदर प्रकरण गृहमंत्र्यापर्यंत नेऊन या कामीं चौकशीसाठी स्वतंत्र ऑफिसर नेमून घेण्याची खटपट झाली. पोलिसतपासांत संबंधित राजकीय पक्षाचे सदस्यांशीं जरी केशवरावजींचा परिचय होता तरी न्यायालयीन शहानिशा होऊन संबंधित इसमांना योग्य ती शिक्षा व्हावी अशी त्यांची फार इच्छा होती. तथापि पोलिसांना भरपूर पुराव्याचे अभावीं खटल्याचें काम पुढें चालवितां आलें नाहीं.

### योगायोग

श्री. केशवराव बुधवार दि. ९ जानेवारी रोजीं सायंकाळचे सुमारास मृत्यु पावले. त्यांच्या मृत्यूची बातमी पुण्यांत फारच थोड्या मंडळींना समजल्यामुळें त्यांचे प्रेतयात्रेस अनेकांना येतां आलें नाहीं. माझ्या जवळच्या नातलगांचे अंत्यविधीसाठीं मीं

स्मशानभूमींत असतांनाच त्या ठिकाणीं श्री. केशवरावांच्या मृत्यूची हकीगत समजली. थोड्याच वेळांत कै. केशवरावांचें शवहि तेथेंच आलें. कै. केशवरावांना अखेरची श्रद्धांजली म्हणून जीं भाषणें झालीं त्यांत श्री. चौबळ वकील, श्री. नेऊरगांवकर सिटी इंजिनिअर व बँकेतर्फे मला श्रद्धांजली वाहाण्याची संधि मिळाली हा मी एक विशेष योगायोगच समजतों.

असो. कै. केशवरावजींच्या आत्म्यास परमेश्वरानें अखंड शांति द्यावी अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून हा 'श्रद्धांजली' लेख पुरा करतों.

### रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. अय्यंगार ?

स्टेट बँकेचे सध्यांचे चेअरमन, श्री. ए. व्ही. अय्यंगार, ह्यांची रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून नेमणूक होणार असल्याचें समजतें. त्यांची जागा फिनॅन्स सेक्रेटरी श्री. भट्टाचार्य हे घेतील.

### श्री. दा. वा. पोतदार ह्यांची फेर-नेमणूक

रिझर्व्ह बँकेच्या पश्चिम विभागाच्या लोकलबोर्डाचे सभासद म्हणून श्री. दा. वा. पोतदार ह्यांची फेरनेमणूक झाली आहे. श्री. कस्तुरभाई लालभाई ( अहमदाबाद ), श्री. मथुरादास मंगळदास परेख ( अहमदाबाद ), श्री. मोहनलाल तंडण ( मुंबई ) व श्री. के. सी. महिंद्र ( मुंबई ) हे बोर्डावरील इतर चार सभासद आहेत.

**खाणीविषयक शिक्षणसंस्था**—भारतीय सरकारनें कोथगुडेम ह्या कोळशाच्या खाणीच्या गांवीं खाणीविषयक शिक्षण देणारें केंद्र स्थापन करण्याचें आहे. देशांत अशा प्रकारची ती पहिलीच संस्था होईल. संस्थेच्या स्थापनेसाठीं ११·५ लाख रुपये खर्च येईल आणि सुरवातीला कोळशाच्या खाणीविषयीं ४० विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यांत येईल. अभ्यासक्रम तीन वर्षांचा असेल.

**भारताविषयीं रशिअन चित्रपट**—भारतीय सरकारच्या अनुबोधपट तयार करणाऱ्या संघटनेनें रशिआंतील अनुबोधपट तयार करणाऱ्या संस्थेच्या सहकार्यानें भारताविषयीं एक चित्रपट केला आहे. 'भारताचा उषःकाल' हें नांव चित्रपटाला देण्यांत आलें आहे. चित्रपटांत भारताचे शिल्प, लोकांचे रीतिरिवाज, इत्यादि विषय आले आहेत.

**ऑस्ट्रेलिआची मदत**—सुएझचा कालवा साफ करण्यासाठीं येणाऱ्या खर्चाला मदत म्हणून ऑस्ट्रेलिआनें संयुक्त-राष्ट्र-संघटनेला १० लाख डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. कामाचा प्राथमिक खर्च भागविण्यासाठी तें देण्यांत आलें आहे. पौंडाच्या चलनांत ही रक्कम ३,५७,१४० रुपये इतकी होते.

**दरोडेखोरांचा बंदोबस्त**—मध्यप्रदेशांतील ग्वाल्हेर, भिंड, मोरेना व दतिआ ह्या जिल्ह्यांतून दरोडेखोरांचा उपद्रव वाढल्यामुळें सरकारनें १८ नवीं पोलिस ठाणीं उघडण्याचें ठरविलें आहे. बंदोबस्ताच्या नव्या योजनेसाठीं ३६ लाख रुपये खर्च येईल. ज्या भागांत दरोडेखोरांचा वावर आहे त्या भागांत राष्ट्रीय विस्तारयोजना सुरू करण्याचाहि विचार करण्यांत येत आहे.

**अलीगड विद्यापीठाला मदत**—अलीगड विद्यापीठानें आपल्या पदार्थविज्ञान शाखेचा विस्तार करण्याचें ठरविलें आहे. शाखेसाठीं नवीन प्रयोगशाळा बांधण्यांत येत आहे. युनिव्हर्सिटी ग्रँटसकमिशननें विद्यापीठाला चालू सालीं ३१·८ लाख रुपये एका रकमेनें मदत म्हणून मंजूर केलें आहेत.

## युनायटेड नेशन्समधील अधिकाऱ्यांच्या जागा

### योग्य वाटणीची मागणी

युनायटेड नेशन्सच्या जनरल असेंब्लीच्या बजेटरी कमिटींत भारताचे श्री. आर. वेंकटरामन् ह्यांनीं तक्रार केली, कीं युनायटेड नेशन्समधील महत्त्वाच्या जागीं अजूनहि आशिया, आफ्रिका व द. अमेरिका येथील देशांच्या लोकांना योग्य प्रमाणांत नेमलें जात नाहीं. धोरण आखण्याचें महत्त्वाचें काम करणाऱ्या ९७ अधिकाऱ्यांची वाटणी खालीलप्रमाणें आहे :—

अमेरिका : २५
पश्चिम युरोपांतील देश : ३२
पूर्व युरोपांतील देश : ११
आफ्रिकेंतील व आशियांतील देश : ११
द. अमेरिकेंतील देश : ७

आफ्रिकेंतील व आशियांतील देशांच्या ११ जागांपैकीं ५ जागांवर चांगायशेकच्या चीनचे प्रतिनिधी आहेत !

युनायटेड नेशन्सच्या सभासद-राष्ट्रांच्या स्वरूपाचें यथार्थ प्रतिबिंब त्याच्या सचिवालयांत पडलें पाहिजे, असें श्री. वेंकटरामन् ह्यांनीं सांगितलें.

## सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

### डिव्हिडंड १४% झालें

सेंट्रल बँकेस ३१ डिसेंबर, १९५६ अखेर संपलेल्या वर्षीं गेल्या वर्षीच्या हिशेबांतून ओढलेले १८,४०,३५९ रु. धरून एकूण १,२२,७६,६४३ रु. नफा झाला. खालीलप्रमाणें विनियोग आधींच करण्यांत आला आहे:—

| | रु. |
|---|---|
| पहिल्या सहामाहीचे इंटेरिम डिव्हिडंड १२% करमाफ म्हणजे प्रत्येक शेअरला १ रु. ८ आ. प्रमाणें १२,५८,१७० शेअर्सवर | १८,८७,२५५ |
| बँकेच्या इन्व्हेस्टमेंट्स खातीं वर्ग | १५,००,००० |
| करासाठीं तरतूद | १३,००,००० |
| स्टाफ ग्रॅच्युइटी फंडाकडे वर्ग | ५,००,००० |
| स्टाफ बोनसची तरतूद | २७,५०,००० |
| | ७९,३७,२५५ |

ह्या विनियोगानंतर ४३,३९,३८८ रु. नफा उरतो. त्याचा विनियोग पुढीलप्रमाणें करावा अशी डायरेक्टरांची शिफारस आहे.

| | रु. |
|---|---|
| ३१ डिसेंबर १९५६ अखेरचें १६% करमाफ दरानें फायनल डिव्हिडंड, १२,५८,१७० शेअर्सवर (म्हणजे, सबंध वर्षासाठीं १४% असा दर पडतो ) | २५,१६,३०० |
| पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढावे | १८,२३,००० |
| | १,२२,७६,६४३ |

## पुढे पाऊल

"पुढे पाऊल" ह्या पुस्तकांत श्री. काळे ह्यांनीं दैनंदिन व्यवहारांत समजून आचारावयाचा व्यवहार सूक्ष्मपणें, विचारपूर्वक मांडला आहे; स्वतःभोंवतालच्या परिस्थितींतून आयुष्य सुखी करण्याचा सोपान मार्ग दाखविला आहे.

—दा. वा. पोतदार

# पश्चिम महाराष्ट्राचा औद्योगिक विकास

लेखक : श्री. म. ना. गोगटे, बी. एस्सी. ( ऑनर्स )
बी. एस्सी. (टेक्)

( ३ )

**दळणवळणाचीं साधनें**—गेल्या लेखांतील जंत्रीवरून येत्या ५–७ वर्षांत प. महाराष्ट्राचा औद्योगिक विकास होण्याची केवढी शक्यता आहे याची कल्पना येऊं शकेल. मात्र या उद्योगधंद्यांच्या निर्मितीला व वाढीला उपयुक्त अशीं वाहतुकीचीं साधनें व सोयी उपलब्ध होणें अत्यावश्यक आहे. सर्व ऋतूंत चालू शकतील असे रस्ते होणें जरूर आहे. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरें सुधारणें, गाळ काढणें, जेटीज व मालगुदामें बांधणें वगैरे गोष्टींकडे लक्ष पुरविणें अगत्याचें आहे.

दिवा–दासगांव, मनमाड–मालेगांव–धुळें – अमळनेर, दौंड–वालचंदनगर–अक्लुज–माळीनगर–श्रीपूर–पंढरपूर, पुणें–नाशिक, पुणें–नगर–परळी वैजनाथ, बिलीमोरा–वघाई ( डांग )–नाशिक, पैठण–घोटी वगैरे महत्त्वाचे दुवे रेल्वेमार्गानें जोडले जाणें आवश्यक आहे. कोंकण रेल्वे ( दिवा–दासगांव ) झाल्यानें कोंकणांतील मालाची व उतारूंची ने–आण करणें बारमास शक्य होईल. हे नवीन रेल्वेमार्ग होण्यासाठी महाराष्ट्रांतील नेत्यांनीं दिल्लींत आपलें वजन खर्च करणें जरूर आहे.

**औद्योगिक वसाहती**—कल्याणजवळ सरकारनें औद्योगिक वसाहत ( Industrial Estate ) काढली आहे व तेथें उद्योगधंद्यांना सवलती व सोयी उपलब्ध होणार आहेत. याच धर्तीवर कोयनेच्या परिसरांत कराडजवळ, कुलाबा जिल्ह्यांत उरण-खारपाड्याजवळ औद्योगिक वसाहती वसविणें सोईचें होईल. तेथेंहि स्वस्त जागा, मुबलक पाणी, निचऱ्याची सोय, वीज, कुशल कामगारवर्ग वगैरे आवश्यक गोष्टी उपलब्ध आहेत. निरनिराळ्या ठिकाणीं अशा वसाहती बसविल्यानें उद्योगधंद्यांच्या सोयींबरोबर त्यांचें विकेंद्रीकरणहि साधणार आहे.

**कर व बंधनें**—निश्चित वातावरणांत अव्याहत रीतीनें उत्पादन होण्याच्या दृष्टीनें सरकारी कर व बंधनें व मजूरविषयक कायदे यांचाहि दहादहा वर्षांपुरता फेरविचार करून सरकारी अविचलित नीतीची घोषणा होणें इष्ट आहे. सरकारी बंधनें व कर एकाएकीं आल्यानें उत्पादनाचें कसें नुकसान होतें तें सर्वज्ञात आहेच.

खाजगी उद्योगधंद्यांना सध्यां वारंवार बदलणाऱ्या सरकारी धोरणाचा कसा जांच होतो हें आपण पहातोंच. खाजगी उद्योगधंद्यांचें पंचवार्षिक योजनेंत निश्चित स्थान असून त्यांच्यापासून राष्ट्र कांहीं अपेक्षा बाळगतें. या अपेक्षा सिद्ध व्हावयास लागणारें निश्चिततेचें वातावरण उपलब्ध व्हावयास हवें.

**भांडवल** :—प. महाराष्ट्रांत खाजगी भांडवलाचा अभाव सदैवच भासतो. सहकारी पद्धतीवर कारखान्यांची उभारणी हा त्यावर सर्वांत प्रमुख तोडगा आहे. बँका व पतपेढ्या यांचेकडून सवलतीनें भांडवल मिळण्याची सोय उपलब्ध व्हावयास हवी. इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनकडून कर्ज मिळण्यास अधिक सवलती व कमी बंधनें हवींत. प्राथमिक अवस्था सरकारकडून लायक कारखान्यांस मदतहि अधिक प्रमाणांत होणें आवश्यक आहे.

**ग्रामोद्योग व कुटिरोद्योग** :—हातमाग, हस्तकला ( बुरूड काम, सुतारकाम ) इत्यादि व्यवसायांतील कारागिरांना प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीनें सरकारनें सवलती देणें आवश्यक आहे. सवलतीच्या दरांत कर्ज, सहकारी तत्त्वावर प्रोसेसिंगच्या सोई, मर्केटिंगची सोय, तांत्रिक शिक्षणाची सोय अशा निरनिराळ्या तऱ्हेनें त्यांना उत्तेजन देतां येण्यासारखें आहे.

**लहान व मध्यम उद्योगधंदे**:—याच धर्तीवर लहान व मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांनाहि प्रोत्साहन मिळण्यास हवें. खास करून मोठ्या उद्योगधंद्यांना सुटे भाग पुरविण्याची मक्तेवजा सवलत जेथें शक्य असेल तेथें उपलब्ध केली पाहिजे. मोठे उद्योगधंदे व लहान उद्योगधंदे यांचेमधील अनिष्ट स्पर्धा नष्ट झाली पाहिजे. तरच लोकांना अधिक प्रमाणांत कामें मिळून बेकारीला आळा बसेल.

लहान व मध्यम उद्योगधंद्यांचे वापरासाठी प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं अद्यावत् सहकारी पद्धतीचीं वर्कशॉप्स उघडावीं. त्याचप्रमाणें त्यांना करआकारणींत सवलती व कर्जाची सोय उपलब्ध करून द्यावी. असें केल्यास बरेच लहान उद्योगधंदे सुरू होतील.

**तांत्रिक शिक्षण** :—प. महाराष्ट्रांत उद्योगधंदे वाढण्याला तंत्रज्ञ, इंजिनिअर व कारागीर मिळाले पाहिजेत, या दृष्टीनें तांत्रिक शिक्षणाची सोय अधिक प्रमाणांत उपलब्ध होणें आवश्यक आहे. व्यापाराचें ज्ञान, हिशोब, व्यापारांतील खुब्या यांचेंहि सम्यग ज्ञान महाराष्ट्रीय तरुणांना मिळालें पाहिजे.

चेंबर्स ऑफ कॉमर्स, व्यापारी संस्था वगैरेंनीं परदेशांतील व्यापारउद्योगांची माहिती व तांत्रिक माहिती गोळा करून जनतेस व्याख्यानें व लेखांद्वारें पुरविली पाहिजेत.

**वणिज्यवृत्ति** :—महाराष्ट्रांतील जनतेला व्यापाराभिमुख बनवून त्यांच्यांत वणिज्यवृत्ति निर्माण होणें अतिशय जरूरीचें आहे. स्वतंत्र व्यापारउद्योगांविषयीं उदासीनता व नोकरीच्या मागें धांव घेण्याची प्रवृत्ति नष्ट करून उद्योगशीलतेचें नवें चैतन्य महाराष्ट्रांतील तरुणांमध्यें निर्माण करण्याची मोठी जबाबदारी समाजधुरिणांवर पडते. विद्वान् अर्थशास्त्रज्ञ, सामाजिक नेते व राजकीय पुढारी यांनीं ही आपली नवी जबाबदारी ओळखून त्या दृष्टीनें प्रयत्न केले पाहिजेत. "प्रयत्नांतीं परमेश्वर" या न्यायानें कालांतरानें लढवय्या महाराष्ट्रीय हा उद्योगव्यापार शूरही होईल यांत शंका नाहीं.

महाराष्ट्राचें भवितव्य उज्ज्वल आहे. पराक्रमी परंपरेनें त्यानें आजवर भारतांत आपलें विशिष्ट स्थान राखलें आहे. महाराष्ट्रांत औद्योगिक क्रांति होऊन याहि आघाडीवर महाराष्ट्र आपलें व पर्यायानें भारताचें नांव राखील व सौख्यशांतीचें आणि नवचैतन्याचें साम्राज्य पसरवील असा दृढविश्वास आहे.

( समाप्त )

---

**अल्पबचतीची योजना**—उत्तर प्रदेशांतील मध्यवर्ती सरकारच्या कचेऱ्यांतून अल्पबचतीच्या मोहिमेसाठी एक नवीन योजना चालू करण्यांत आली आहे. ज्या नोकरांना शिल्लक टाकावयाची इच्छा असेल त्यांनीं आपल्या सहीची वचनचिठ्ठी द्यावयाची व पगाराच्या वेळीं चिठ्ठींतील रक्कम कापून त्या रकमेचें सर्टिफिकेट नोकरांना द्यावयाचें, असें तिचें स्वरूप आहे.

**लामांकडून ट्रकसची मागणी**—जमशेटपूर येथील टाटा कंपनीच्या मोटार–ट्रक्सच्या कारखान्याकडून पंचन लामा व दलाई लामा ह्यांनीं १६ गाड्यांची मागणी केली आहे. गाड्या 'मर्सिडीझ बेन्झ' बनावटीच्या असतील व तिबेटमधील रस्त्यांना अनुरूप अशा रीतीनें त्या बांधण्यांत येतील.

## कंपनीला पोषक धोरणाच्या राजकीय पक्षांना मदत

### टाटा कंपनीच्या मेमोरँडम् दुरुस्तीस हायकोर्टाची मंजुरी

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीनें आपल्या मेमोरँडममध्यें दुरुस्ती केली, तिला कंपनीनें कंपनी कायद्याच्या १७ व्या कलमान्वयें मुंबई हायकोर्टाची मंजुरी मागितली. हायकोर्टानें ही मंजुरी दिली. कंपनीच्या मतें जो राजकीय पक्ष उद्योगधंद्यांचें, विशेषतः टाटा कंपनीच्या उद्योगधंद्याचें हित पाहात असेल, त्याच्या फंडाला कंपनी साहाय्य करूं शकेल, अशा अर्थाची ती दुरुस्ती होती.

सध्यांच्या स्थितींत सर्व उद्योगधंद्यांवर आणि विशेषतः पोलादा-सारख्या मूलग्राही महत्त्वाच्या उद्योगधंद्यावर सरकारी औद्योगिक धोरण विशेष परिणामकारक ठरणारें आहे. ज्या राजकीय पक्षाकडे सरकारी सत्ता येते, तो पक्ष औद्योगिक धोरण अंमलांत आणूं शकतो. तेव्हां, जो पक्ष औद्योगिक प्रगतीस उत्तेजन देण्याचें धोरण आखील व ज्याचें धोरण पोलादाच्या धंद्यास पोषक असेल, अशा पक्षाच्या फंडाला आर्थिक मदत करणें कंपनीच्या हिताचेंच होईल. अशा रीतीनें फंडाला हातभार लावतां यावा, म्हणून मेमोरँडममध्यें आवश्यक ती दुरुस्ती करण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें.

कंपनीचें सध्यांचें भांडवल २७ कोटी रु. असून कंपनी आणखी ७५ कोटी रु. खर्चून वाढीचा कार्यक्रम पार पाडण्याच्या विचारांत आहे. तेव्हां पोलादाचा धंदा खाजगी क्षेत्रांतच कायम रहावा, असें जें सरकार ठरवील त्याला पाठिंबा देणें कंपनीच्या हिताचें होईल. अनुकूल पक्षांच्या फंडाला मदत करण्याचा कंपनीला स्पष्ट अधिकार असावा, हा तिचा सरळ हेतु आहे.

मुंबई हायकोर्टानें (न्या. तेंडोलकर) कंपनीला मेमोरँडममध्यें बदल करण्यास परवानगी दिली. "एकाद्या उमेदवारानें किंवा पक्षानें स्वतःच्या मताविरुद्ध वागून कंपनीला पोषक असें धोरण ठेवण्यासाठीं कंपनीनें त्याला पैसे देणें हें सार्वजनिक हिताचें होणार नाहीं. पण, जो उमेदवार किंवा जो पक्ष कंपनीला पोषक असें धोरण अगोदरच ठेवत असेल, त्याला कंपनीनें मदत करण्यास हरकत नाहीं." असा श्लेष न्यायमूर्तींनीं काढला आहे आणि कंपनीचें धोरण सार्वजनिक हिताविरुद्ध आहे असें एकाद्याहि भागीदाराला वाटलें तर त्यानें कोर्टांत कंपनीविरुद्ध इंजंक्शन मागावें, असें सुचविलें आहे.

कंपनी कायद्याच्या २९२ व्या कलमाप्रमाणें, कंपनीचे डायरेक्टर २५,००० रु. किंवा पूर्वीच्या तीन वर्षांच्या सरासरी नफ्याच्या ५% इतकी रक्कम देणगीदाखल देऊं शकतात; त्याला भागीदारांची संमति आवश्यक नाहीं. ज्यास्त रकमेला मात्र ती आवश्यक आहे. टाटा कंपनीचा वार्षिक सरासरी नफा सुमारें ३ कोटी रु. आहे. तेव्हां, कंपनी वरील कलमाप्रमाणें भागीदारांची संमति न घेतां १५ लक्ष रु. व त्यापेक्षा ज्यास्त रक्कम त्यांच्या संमतीनें देऊं शकते.

प्रस्तुत प्रकरणांत कंपनीनें वार्षिक नफा-तोटा पत्रकांत प्रत्येक पक्षाला दिलेल्या अशा देणग्यांचा तपशील दाखविण्याचें मान्य केलें आहे. अशा प्रसिद्धीमुळें राजकीय जीवनाचा बिघाड होण्यास आळा बसेल. नव्यानें स्थापन झालेल्या कंपन्यांनीं आपल्या मेमोरँडममध्यें राजकीय पक्षांना देणग्या देण्याची मुभा स्वतःकडे घेतलेली आहे, ती टाटा कंपनीला न देणें चुकीचें होईल.

तीन भागीदारांनीं कंपनीच्या हायकोर्टातील अर्जास विरोध केला होता.

## 'एफ्. बी. आय.' व्यापारी मार्गदर्शिका, १९५७

['एफ्. बी. आय.' रजिस्टर ऑफ ब्रिटिश मॅन्युफॅक्चरर्स १९५७, २९ वी आवृत्ति. प्रकाशक: केलीज डिरेक्टरीज लि. व आयुलिफ अँड सन्स लि., डॉरसेट हाऊस, स्टँफोर्ड स्ट्रीट, लंडन. प्रकाशन मूल्य ४२ शिलिंग. आकार ९½". ७½". पृ. ११२४. कापडी बांधणी.]

आपल्या मालाचा जास्तींत जास्त उठाव होण्यास या व्यापार दर्शिकेमुळें, ब्रिटिश उत्पादकांस मदत होणार आहे असें फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीजचे अध्यक्ष श्री. ग्रॅहॅम हेमन आपल्या २९ व्या आवृत्तीचे प्रस्तावनेंत लिहितात तें अगदीं सार्थ आहे असेंच ही दर्शिका पाहिल्यास दिसून येईल. यामध्यें ५४०० अकारनिल्हे नांवांनीं जवळ जवळ ७,००० सभासद-संस्थांच्या विविध कार्यांची व उत्पादनाची सर्वस्पर्शी व अचूक माहिती दिलेली आहे.

या व्यापार मार्गदर्शिकेंत खालील विविध अंगांची सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यांतील विभाग असे :—

(१) वर्गीकृत ग्राहकांचा मार्गदर्शक (Classified Buyers' Guide.)

(२) विविध कंपन्यांचे व संस्थांचे पत्ते.

(३) व्यापारी संघ, व्यापार चिन्हें, यासंबंधीं मौलिक माहिती.

(४) ग्राहकांचे सोईसाठी जर्मन, फ्रेंच व स्पॅनिश भाषांतून शब्दार्थ बोधिनी. यामध्यें प्रमुख ग्राहक मार्गदर्शिकेमध्यें आलेल्या, प्रत्येक वस्तूच्या नांवाचें योग्य भाषांतर आढळेल. त्यासाठीं योग्य क्रमांकाचा वापर केला आहे.

'फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज' या ब्रिटनमधील उद्योगपतींच्या सर्वांत प्रातिनिधिक व प्रभावी संघटनेच्या सहकार्यानेंच ही मार्गदर्शिका प्रकाशकांनीं तयार केली असल्यामुळें, याचें महत्त्व विशेषच आहे.

सर्व व्यापारी वर्ग, ग्राहक, व्यापारी प्रतिनिधी, सरकारी व्यापार व उद्योगखातें, विविध चेंबर्स ऑफ कॉमर्स, अशा सारख्या संस्थांना, वरील मार्गदर्शिका संदर्भ ग्रंथ म्हणून फारच उपयुक्त ठरेल. या व्यापारदर्शिकेची एक नवीन प्रत नुकतीच लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयांत आलेली आहे. तरी जिज्ञासूंनीं तिचा अवश्य उपयोग करून घ्यावा.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.